# उल्हासनगर महानगरपालिका

सुचकाचे नाव :– श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

**शोक प्रस्ताव**

उल्हासनगर महानगरपालिकेचे कर विभागातील कर्मचारी श्री. ओमप्रकाश गुरनानी यांचे दिनांक २६/१२/२०१० रोजी अचानक निधन झाले.

वर उल्लेख केलेल्या कुटूंबियाच्या दुःखात हे सभागृह सहभागी असुन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ६१ अ** **दिनांकः—३/१/२०११**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. ओमप्रकाश गुरनानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊन हे दुःख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. १ :—**उल्हासनगर महापालिकेसाठी ''बांधा वापरा व हस्तांतरण करा'' या तत्वावर स्वत:चा पाणी पुरवठयाचा स्त्रोत विकसित करण्यास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

चार—पाच दिवसापुर्वीच महासभा झाली आणि त्यानंतर लगेच या महासभेची सूचना देण्यात आली. हा जो विषय आहे हा उल्हासनगर शहरवाशियांचा अतिशय जिव्हाळयाचा प्रश्न आहे. त्यावर विस्तृतपणे चर्चा केली पाहिजे.

गोषवा—यामध्ये विषयाशी संबंधित पुर्ण माहिती दिलेली नाही. ही योजना तयार करण्यासाठी किती खर्च येईल याबाबतीत सर्व गटनेते एकत्र बसुन चर्चा करु शकतील. यासाठी हा विषय आजच्या सभेच्या कामकाजातुन वगळण्याप्रयोजनार्थ प्रस्तावित.

**विशेष महासभा ठराव क्र: ६१ ब** **दिनांक:—३/१/२०११**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. बी.बी. मोरे

ही महासभा उल्हासनगर महापालिकेसाठी ''बांधा वापरा व हस्तांतरण करा'' या तत्वावर स्वत:चा पाणी पुरवठयाचा स्त्रोत विकसित करण्याचा प्रस्ताव या सभेच्या कामकाजातुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. २ :—** उल्हासनगर शहरात स्थानिक संस्था कर लागु न करणे व जकात वसुली कायम ठेवण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणे.

**प्रस्तावना**

या विषयाचा गोषवारा परिपुर्ण नाही. यापुर्वी जेव्हा स्थानिक संस्था कर लागु करण्याचा विषय आला होता त्यावेळी सभागृहातील सर्व सदस्यांनी व व्यापा—यांनी स्थानिक संस्था कर लागु करण्यास पुर्ण विरोध केला होता. या विषयाबाबत सर्व गटनेत्यांची बैठक घेणे आवश्यक आहे. तसेच व्यापा—यांची एक बैठक घेणे आवश्यक आहे. यासाठी हा विषय या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्याप्रयोजनार्थ प्रस्तावित.

**विशेष महासभा ठराव क्र: ६१ क** **दिनांक:—३/१/२०११**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

ही महासभा उल्हासनगर शहरात स्थानिक संस्था कर लागु न करता जकात वसुली कायम ठेवण्याप्रयोजनार्थ शासनाकडे प्रस्ताव पाठविणेचा प्रस्ताव या सभेच्या कामकाजातुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :–श्री. बी.बी. मोरे

**<u>स्थगित प्रस्ताव</u>**

आजच्या या सभेचे कामकाज स्थगित करुन ही सभा पुढील सूचना देईपर्यंत स्थगित करण्यासाठी प्रस्तावित.

**<u>महासभा ठराव क्र.</u>** **<u>दिनांक : ३/१/२०११</u>**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता आज दिनांक ३/१/२०११ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज पूढील सूचना देईपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

**<u>सर्वानुमते</u>**

महापौर/पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

**विषय क्र. २ :—** उल्हासनगर शहरात स्थानिक संस्था कर लागु न करणे व जकात वसुली कायम ठेवण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर शहरात आयात होणाऱ्या जकात पात्र मालावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७ (२) (अ) नुसार जकात आकारणी करण्यात येते. जकात आकारणीसाठी आयात होणाऱ्या विविध वस्तूंची वर्गवारी एकूण ८६ गटात करण्यात आलेली आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेने जकात आकारणी व वसूली या कामाचे वर्ष—१९९७ पासून खाजगीकरण केलेले असून आजपर्यंत ही वसूली खाजगी अभिकर्त्यांमार्फत करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेत जकात व मार्गस्थ फी यासाठी एकच निविदा मागविण्यात येत असून या कामी प्राप्त झालेल्या मागील पाच वर्षापासूनचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | प्रत्यक्ष जकात वसूली | मार्गस्थ फी |
|---|---|---|---|
| १ | २००६—२००७ | ७०.६१ कोटी | —— |
| २ | २००७—२००८ | ७७.७० कोटी | ६४ लाख |
| ३ | २००८—२००९ | ९२.६५ कोटी | ६७ लाख |
| ४ | २००९—२०१० | १०२.०६ कोटी | ७१ लाख |
| ५ | २०१०—२०११ | ११४.६१ कोटी | ५६ लाख (एप्रिल ते नोव्हेंबरपर्यंत) |

जकातीच्या एकूण वसूलीत मार्गस्थ फीचा समावेश आहे. वर्ष—२००९—२०१० मध्ये गट निहाय प्राप्त झालेल्या वसूलीचा तपशिल दर्शविणारा तक्ता सोबत जोडत आहे.

**नोंदणी शुल्क:—**मुंबई नोंदणी शुल्क अधिनियमाअंतर्गत नोंदणी होत असलेल्या दस्तऐवजांवर नोंदणी शुल्क वसूलीचे कार्य दुय्यम निबंधक कार्यालय उल्हासनगर यांचे मार्फत पार पाडण्यात येते. मागील दोन वर्षात नोंदणी शुल्कापोटी प्राप्त, झालेल्या रक्कमेचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | रक्कम |
|---|---|---|
| १ | २००९—२०१० | १२.४८ कोटी |
| २ | २०१०—२०११ (एप्रिल ते नाव्हेंबर पर्यंत) | ६.०१ कोटी |


| अ.क्र. | वर्ष | रक्कम |
|---|---|---|
| १ | २००९—२०१० | १२.४८ कोटी |
| २ | २०१०—२०११ (एप्रिल ते नाव्हेंबर पर्यंत) | ६.०१ कोटी |


मुंबई दुकाने व संस्था अधिनियम अंतर्गत नोंदणीचे तपशिल:— मुंबई दुकाने व संस्था अधिनियम अंतर्गत उल्हासनगर शहरातील संस्था नोंदणीचे कार्य मुंबई दुकाने व संस्था नोंदणी कार्यालय उल्हासनगर यांचे मार्फत पार पाडण्यात येते.

उल्हासनगर शहरातील या अधिनियमांतर्गत एकूण १९.३४३ नोंदणीकृत संस्था असून त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संस्थेचा प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १ | दुकाने | ७,८७५ |
| २ | कारखाने | ९,७१६ |
| ३ | हॉटेल्स | १,७०७ |
| ४ | सिनेमाघरे व इतर मनोरंजनाची स्थळे | ४५ |
| | एकूण | १९,३४३ |

**उल्हासनगर शहरातील कंपनीबाबत:—** उल्हासनगर शहरात फक्त — कंपन्या असून त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंपनीचे नांव | शेरा | |
|---|---|---|---|
| १ | सेंच्युरी रेयॉन | कंपनी सुरु आहे | **एकूण ४ कंपन्यापैकी** |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | अमरडाय | कंपनी बंद आहे | **३ कंपन्या बंद आहेत.** |
| ३ | बी.आर.हारमन मोहता | कंपनी बंद आहे | |
| ४ | आयडीआय / नेव्हीनॉन | कंपनी बंद आहे | |

१) **आयात होणाऱ्या वस्तू**:—उल्हासनगर शहरात आयात होणाऱ्या विविध वस्तूपैकी कपडा या वस्तूवर करण्यात आलेली जकात आकारणी अंदाजे २० टक्के आहे. कपडयावर वॅट किंवा इतर कोणत्याही प्रकारचा कर राज्य शासनामार्फत आकारण्यात येत नाही व त्यावर नियंत्रणसाठी कोणतीही यंत्रणा उपलब्ध नाही. जेणे करुन शहरातील आयातधारक याबाबत लेखे ठेवीत नाहीत.

शहरातील अंदाजे ७० ते ८० टक्के व्यापार बीलशिवाय होत आहे व त्याबाबतचे कोणतेही लेखे ठेवण्यात येत नाही.

२) **जेएनएनयुआरएम योजना**:— उल्हासनगर महानगरपालिकेने जेएनएनयुआरएम योजनेत भाग घेतला असून उलहासनगर शहरासाठी पाणी पुरवठा, बीएसयुपी व ई गर्व्हनर्स प्रकल्प मंजूर करण्यात आलेले आहे. सदर योजना पार पाडणेसाठी महापालिकेस १०० कोटी पर्यंत रक्कम स्वत:चा हिस्सा म्हणून येत्या २ वर्षात गुंतवणूक करावयाची आहे.

३) **६ वा वेतन आयोग अंमलबजावणी**:— केंद्र व राज्य शासनाच्या आधरावर उल्हासनगर महानगरपालिकेनेही कर्मचाऱ्यांसाठी ६ वा वेतन आयोग लागू केला असून, कर्मचारी पगारापोटी अंदाजे ४० टक्के खर्च वाढला आहे. पगार भत्ते व इतर प्रशासकीय खर्चापोटी महापालिकेस अंदाजे ५० कोटी प्रतिवर्ष खर्च करावा लागतो.

४) **एमआयडीसी**:— शहरातील नागरीकांना पाणी पुरवठा करणे हे कार्य महापालिकेमार्फत पार पाडण्यात येते. महापालिकेस पाण्याचा स्वत:चा स्त्रोत नसून महापालिका एमआयडीसी कडून पाणी खरेदी करीत आहे व त्यापोटी एमआयडीसी ५० कोटी प्रतिवर्ष अदा करावे लागतात. पाणी वितरण व्यवस्था देखभाल दुरुस्ती व इतर बाबीं मिळून पाणी पुरवठा या सेवेपोटी अंदाजे ३६ कोटी खर्च करावा लागतो.

जकातीमुळे महापालिकेस दरवर्षी १० टक्के वाढ प्राप्त होत आहेत व चालू वर्षासाठी महापालिकेस जकातीपोटी ११४ कोटी प्राप्त होणार आहेत. त्यामध्ये १० टक्के वाढ गृहीत धरल्यास कमीत कमी ११ कोटी रुपये पुढील वित्तीय वर्षात आगाऊ प्राप्त होतील व ती जेएनएनयुआरएम योजना पार पाडण्यासाठी सहायभूत ठरेल.

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता. जकात सुरु ठेवणे उल्हासनगर शहराच्या हिताचे होईल, अन्यथा महापालिकेची अर्थव्यवस्था कोलमडून पडेल.

विशेष महासभा ठराव क्र: दिनांक:—३/१/२०११

सुचकाचे नाव :—

अनुमोदकाचे नाव :—

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर शहरात स्थानिक संस्था कर लागु न करता जकात वसुली कायम ठेवण्याप्रयोजनार्थ शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

**विषय क्र. १** :–उल्हासनगर महापालिकेसाठी ''बांधा वापरा व हस्तांतरण करा''

या तत्वावर स्वत:चा पाणी पुरवठयाचा स्त्रोत विकसित करण्यास

मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहराच्या पाणी पुरवठा व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी तसेच पाणी पुरवठया बाबत स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने उपाय योजना राबविण्याकरिता महापालिकेने मे २००३ मध्ये श्वेतपत्रिका प्रसिध्द केली आहे. सदर श्वेतपत्रिकेनुसार शहराच्या पाणी पुरवठा समस्येबाबत अल्पकालीन व दीर्घकालीन उपाय योजना राबविण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

सदर धोरणानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास योजनेचा प्राथमिक अहवाल तयार करण्याचे सांगण्यात आले होते. म.जी.प्रा. मार्फत उल्हासनदी हा उद्‌भव गृहीत धरून व सन २०३८ ची लोकसंख्या १०,८०,२६० गृहीत धरून १७१ द.ल.ली क्षमतेच्या योजनेचे प्राथमिक अहवाल तयार करण्यात आला सन २००४–०५ च्या दरसुचीवर आधारीत दरानुसार योजनेची ढोबळ किंमत १०२ कोटी येत होती त्यात वितरणव्यवस्थेच्या कामाचा समावेश होता या योजनेत खालील कामांचा समावेश करण्यात आला आहे.

उद्‌भव विहीर
पंपिग मशीनरी व पंप हाऊस
प्रक्रियापूर्व पाण्याची जलवाहिनी
जलशुध्दीकरण केंद्र (क्षमता १७० द.ल.लि.)
मुख्य संतूलन टाकी
शुध्द पाण्याची जलवाहिनी
उंच जलकुंभ
इतर कामे

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळा प्रमाणेच उल्हासनदीतून शहाड येथून कल्याण–डोंबिवली महानगर पालिकेची व स्टेम प्राधिकरणाची पाणी पुरवठा योजना आहे, या योजनेमधुन, स्टेम प्राधिकरण भिवंडीशहरास रू ३.५० प्रति १००० लि. दराने, व ठाणे, मिरा भाईंदर या शहरांना रू. ४.५० प्रति १००० लि. या दराने ठोक स्वरुपात शुध्द पाण्याचा पुरवठा करते. तसेच शेजारील मनपा/नपांचे पाण्याचे दरही कमी आहेत.

सद्यस्थितीत शहरात म.औ.वि.मंडळ एकूण १२० द.ल.लि. प्रतिदिन एवढा पाणी पुरवठा होतो. स्वत:चा स्त्रोत नसल्यामुळे पाणी पुरवठयासाठी महापालिकेस पूर्णत: म. औ.वि.मडळावर अवलंबून रहावे लागते. त्यांचेकडील पाणी पुरवठयाचा सध्याचा दर रू. ७/– प्रति हजार लिटर्स एवढा असून तो अवाजवी व महानगरपालिकेस न परवडणारा आहे. सध्या पाणी पुरवठयावरील खर्चापोटी उल्हासनगर महानगरपालिकेस दरवर्षी प्रचंड तुट सहन करावी लागत आहे.

**<u>महासभेचे निर्णय :–</u>**

१) पाणी पुरवठा व मलनि:सारण क्षेत्रात कार्यक्षमता व गुंतवणुक वाढविण्यासाठी खाजगी संस्थाचा सहभाग करणेसाठी महासभेने ठराव क्रं. ९६ दि. २८/१/२००३ अन्वये निर्णय घेतलेला आहे. याचा उद्‌देश पाणीपुरवठा योजनेत कार्यक्षम व्यवस्थापन निर्माण करणे हा आहे.

२) महानगरपालिकेचे आर्थिक दायित्व, भांडवली खर्च, कर्जाची परतफेड या बाबी लक्षात घेता मा. महासभेमार्फत ठराव क्रं. २८, दि. ७/८/२००४ अन्वये स्वत:चा स्त्रोत विकसीत करण्यासाठी सवलत कराराच्या आधारावर निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात आली.

३) विशेष महासभा ठराव क्र. १७ दिनांक २०/०९/२००६ अन्वये खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

हि महासभा विशेष महासभा ठराव क्र. २८ दिनांक ०७/०८/२००४ रद्द करीत असुन, पाणी योजनेचे खाजगीकरण न करता पाणी पुरवठा महानगरपालिकेच्या माध्यमातुन जास्तीत जास्त सुधारणा करून नागरीकांची सेवा चालू ठेवण्यास प्रस्तावीत करीत आहे.

**निविदा प्रक्रिया :—**

त्यानंतर योजना सवलत कराराच्या आधारावर म्हणजेच ''बांधा वापरा व हस्तांतर'' या तत्वावर राबवणे करीता दिनांक २२/१०/०४ रोजी जाहिर सूचना प्रसारित करून निविदा मागविण्यात आल्या होत्या.

**स्थायी समितीचा निर्णय :—**

मे प्रतिभा इंडस्ट्रीज यांच्या न्युनतम दराच्या निविदेस मा. स्यायी समितीचा ठराव क्र. ६७ दि. ०८/१२/२००६ नुसार मान्यता देण्यात आली. त्यानंतर महानगरपालिकेचे पत्र क्र. १४८ दि. १२/१२/२००६ नुसार निविदा धारकास निविदा स्वीकृतीबाबत कळविण्यात आले.

**न्याय प्रविष्ट बाब :—**

सदर मे. प्रतिभा इंडस्ट्रीज यांना निविदा स्वीकृतीचे पत्र दिल्यावर वरील तीन निविदा धारकापैकी तांत्रिक अहवालानुसार अप्राप्त ठरलेले निविदा धारक मे. गॅमन इंडिया लिमिटेड यांनी महानगरपालिकेविरुध्द दावा क्र. ६३५ सन २००७ नुसार मा. उच्च न्यायालयात दावा दाखल केला सदर मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निविदा प्रक्रीयेला आहे त्या स्थितीत थांबा (ैज्ंल) देण्यात आला व त्यामुळे कामाचे करारनामे करता आले नाही सदर प्रकरण जानेवारी २००७ पासुन न्यायप्रविष्ट होते.

महानगरपालिकेला महाराष्ट्र औद्योगीक विकास मंडळाकडुन अवाजवी दराने व अनियमीत पाणी पुरवठा होत असल्यामुळे स्वत:चा स्त्रोत विकसीत करण्याचा प्रस्ताव मंजुर करण्यात आला. परंतु सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्यामुळे

महानगरपालिकेचा हेतु साध्य झालेला नाही. तसेच महानगरपालिकेस खालील बाबीपोटी मोठया प्रमाणात नुकसान सहन करावे लागत आहे.

१) ''बांधा वापरा व हस्तांतर करा या तत्वावर स्वत:चा स्त्रोत विकसीत करणे'' ही

योजना न्यायालयीन बाब असल्यामुळे अद्याप आमलात आणता आलेली नाही.

२) महानगरपालिकेस महाराष्ट्र औद्योगीक विकास मंडळाकडुन अवाजवी दराने पाणी

खरेदी करावे लागत असल्यामुळे मोठया प्रमाणात नुकसान सहन करावे लागत आहे.

३) सन. २००६ ते आतापर्यत कामास विलंब झाल्यामुळे तसेच बाजार भावात मोठया

प्रमाणात वाढ होत असल्यामुळे प्रस्तावित प्रकल्पाची किंमत वाढत आहे

जवाहरलाल नेहरु नागरी पुर्ननिर्माण अभियान :—

महानगरपालिकेमार्फत केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नागरी पुर्ननिर्माण अभियाना अंतर्गत शहराचा विकास आराखडा ;ब्क्च्द्ध तयार करण्यात आला त्यात सुध्दा, स्वत:चा पाणी पुरवठयाचा स्त्रोत विकसीत करण्याच्या कामाचा समावेश करण्यात आला आहे. तसेच जवाहरलाल नेहरु नागरी पुर्ननिर्माण अभियाना अंतर्गत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या प्रकल्पास केंद्र शासनामार्फत मंजुरी देते. वेळेस स्वत:चा स्त्रोत विकसीत करणेचे काम करणेबाबत नमुद करण्यात आले आहे.

**कामाच्या स्वरूपातील बदल :—**

ERROR: syntaxerror
OFFENDING COMMAND: %ztokenexec_continue

STACK:

-filestream-